MHWS080002672025

## <u>रे.मु.नं. १९/२०२५ मधील निशाणी क्र.१८ वरील आदेश</u>

**१.** प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रीया संहीतेचे नियम ०६ आदेश १७ प्रमाणे मूळ दाव्यात दुरुस्ती होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे अर्जातील कथनानुसार, वादींना दाव्याच्या शिर्षकात ताबा मिळणेबाबत असे नमूद करायचे असून मीन प्राकीट असा शब्द नमूद करुन कोर्ट फीच्या रकमेत बदल करायचा आहे. दाव्याच्या परिच्छेद क्र.१ मध्ये शेवटी पूर्व—पश्चिम ४ फूट व दक्षिण—उत्तर ५ फूट अशी एकूण २० चौरस फूट जागा वादीच्या ताब्यात नाही असे नमूद करायचे आहे. तसेच वादमिळकतीची उपअधिक्षक कार्यालय रिसोड यांच्याकडून मोजणी व खुणा कायम करण्याचा आदेश वादीला आवश्यक आहे, परिच्छेद ३ मध्ये शेवटी ताबेदार शब्द काढून टाकायचा आहे. परिच्छेद क्र.४ मध्ये अतिक्रमण करीत आहे ऐवजी अतिक्रमण केले आहे हे नमूद करायचे. परिच्छेद क्र.५ मध्ये दि.२४.१२.२०२४ रोजी प्रतिवादींनी वादीची ४ X ५ = २० फूट जागा बेकायदेशीर ताब्यात घेतली हे नमूद करायचे आहे. दाव्याच्या परिच्छेद क्र.०९ मध्ये जुनी विनंती काढून त्या ऐवजी वादमिळकतीपैकी ४ X ५ = २० फूट जागा प्रतिवादींनी वादीला ताब्यात दयावी असा आदेश हुकूमनामा दयावा हे नमूद करायचे आहे. तसेच वादमिळकतीची उपअधिक्षक भूमी कार्यालयाकडून कायम खुणा करुन देण्याचा आदेश दयावा व जोपर्यंत जागेचा ताबा प्रतिवादी देत नाही तो पर्यंत नुकसान भरपाई वादीला देण्याचा आदेश पारीत करावा असे नमूद करावयाचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नसून दाव्याचा मूळ हेतू बदलत नाही. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार नसून त्यांना लेखी जबाब देण्याची पूर्ण संधी मिळणार आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली.

**३.** सदर अर्जावर प्रतिवादीतर्फे नि.क्र.१९ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादींचे अर्जातील संपूर्ण मजकूर व दुरुस्तीच्या मागण्या प्रतिवादींना अमान्य असून वादीने कायम मनाईकरीता दावा दाखल केलेला आहे व नि.

क्र.०५ वर सुनावणी होउन वादीचा तात्पुरत्या स्वरुपाच्या मनाई मागणीचा अर्ज न्यायालयाने फेटाळलेला आहे. वादी सदर दुरुस्तीदवारे दाव्याचे मूळ स्वरुप व हेतू बदलण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा स्वरुपाची दुरुस्ती वादीस दाव्यात करता येणार नाही व अशी दुरुस्ती मंजूर झाल्यास प्रतिवादीचे कधीही भरुन न निघणारे नुकसान होईल. वादीने सदरचा अर्ज प्रकरणात विलंब व्हावा याकरीता दिलेला असल्याने खर्चासह अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन करता वादीने प्रस्तुतचा दावा केवळ निरंतर मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.०१ व ०२ यांनी हजर होउन नि.क्र.१२ वर लेखी जबाब सादर केलेला असून त्यानंतर वादीचा नि.क्र.५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज गुणदोषांवर विचाराधीन घेउन नामंजूर करण्यात आल्याचे दिसून येते.

५. या ठिकाणी वादीच्या मूळ दाव्याचे अवलोकन करता वादमिळकत वादींच्या ताब्यात असून प्रतिवादी हे सदर वादमिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करत असल्याने त्यांचेविरुध्द निरंतर मनाईचा हुकूमाची मागणी केलेली आहे. मात्र सदर दुरुस्तीदवारे वादी दाव्याचे शिर्षकात पूर्णपणे बदल करुन पूर्वीचे ‘कायमचा मनाई हुकूम मिळणेबाबतचा दावा’ हे शिर्षक बदलून ‘ताबा मिळणेकरीता तसेच दरम्यानचे उत्पन्नाकरीता दावा’ अशी दुरुस्ती मागत आहे. तसेच दाव्याचे विनंती कलम देखील पुर्णपणे बदलून त्या ऐवजी प्रस्तुत अर्जादवारे समाविष्ट केलेली वादमिळकत (पूर्व—पश्चिम ४ फूट व दक्षिण—उत्तर ५ फूट अशी एकूण २० चौरस फूट जागा) ही प्रतिवादींनी वादीला ताब्यात दयावी असा आदेश, वादमिळकतीची उपअधिक्षक भुमिअभिलेख रिसोड यांचेकडून मोजणी होउन कायम खुणा करुन देण्याचा आदेश व वादमिळकत जागेचा ताबा मिळेपर्यंत नुकसान भरपाई/दरम्यानचे उत्पन्न वादीला देण्याचा आदेश अशा तीन वेगवेगळया आदेशांबाबत विनंती नमूद करण्याची दुरुस्ती मागितलेली आहे. सदरच्या दोन्ही दुरुस्त्या पाहता वादी संपूर्ण दाव्याचे व त्यातील मागण्यांचे स्वरुप बदलवू इच्छित असल्याचे दिसून येते.

६. वादीला सदर दुरुस्तीदवारे वादमिळकतीमध्ये जादा मिळकत म्हणून पूर्व—पश्चिम ४ फूट व दक्षिण—उत्तर ५ फूट अशी एकूण २० चौरस फूट जागा

समाविष्ट करण्याची असून मूळ दाव्यातील वादीच्या कथनानुसार दावा मिळकतीचा ताबा वादीचा असून त्यास प्रतिवादी हे अतिक्रमण करुन हरकत करत असल्याचे नमूद केलेले आहे. मात्र सदर दुरुस्तीदवारे वादीस प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे असा मजकूर नमूद करुन त्याचा ताबा प्रतिवादींनी वादींना दयावा अशी दुरुस्ती मागितलेली आहे. मूळ दाव्यातील कथने व दुरुस्तीदवारे मागितलेली कथने पाहता वादी एकाच वेळी दावा मिळकतीत ताबा असून त्यात प्रतिवादी अतिक्रमण करत असल्याचे व दावा मिळकतीत प्रतिवादींनी अतिक्रमण केले असून त्यात वादीचा ताबा नसल्याने तो ताबा वादीला प्रतिवादीकडून मिळावा अशी विरुध्द कथने सादर करतो. वादीला एकाच वेळी ताबा आहे असे म्हणून मनाईचा हुकूम व ताबा नाही असे म्हणून ताब्याची मागणी करता येणार नाही.

७. वादीचे दुरुस्ती अर्जातील कथन पाहता वादीला दाव्यातील परिच्छेद क्र. ०३ मध्ये शेवटी ताबेदार हा शब्द काढून टाकायचा आहे मात्र मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.०३ मध्ये शेवटी तसा कोणताही शब्द दिसून येत नाही. वादीला परिच्छेद क्र.०४ मध्ये अतिक्रमण करीत आहे या शब्दाऐवजी अतिक्रमण केले आहे अशी दुरुस्ती हवी आहे. मात्र मूळ दाव्यातील परिच्छेद क्र.४ मध्ये अतिक्रमण करीत आहे असा शब्दच नमूद असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे वादीला निश्चीत कोठे व कोणती दुरुस्ती अपेक्षीत आहे याचा कोठेही बोध होत नाही.

८. याठिकाणी युक्तीवादादरम्यान प्रतिवादीतर्फे दामोदर दास गोविंदप्रसाद सांगी वि. फतेहसिंह कल्याणजी ठककर आणि इतर हा मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील न्यायनिर्णय दाखल करुन त्यातील निर्वाळयानुसार जर दाव्याचे स्वरुप किंवा कारण दुरुस्तीमुळे बदलत असेल तर त्यामुळे मूळ दाव्यापेक्षा वेगळी अशी संपूर्णपणे नविन केस निर्माण होणार असून अशाप्रकारची दुरुस्ती निश्चीतपणे नामंजूर करणे गरजेचे असल्याचे कथन केलेले आहे. वादीचा मूळ दावा व तदनंतर प्रस्तुत अर्जादवारे मागितलेली दुरुस्ती पाहता सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप, हेतू पूर्णपणे बदलणार असल्याचे दिसून येत असून वर नमूद न्यायनिवाडयातील निर्वाळा याकामी लागू होत असल्याचे दिसून येते.

९.		दि.प्र.सं.आदेश ०६ नियम १७ नुसार दाव्याचे कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकारास त्याचे कथनात मूळ दाव्यातील वादातीत मुददा गुणदोषावर निकाली काढण्याच्या अनुषंगाने आवश्यक असलेली दुरुस्ती करता येते मात्र वादीने प्रस्तुत अर्जादवारे मागितलेली दुरुस्ती म्हणजेच दावामिळकतीत अतिरिक्त मिळकत समाविष्ट करणे, दाव्याचे मूळ शिर्षक व संपूर्ण विनंती कलम बदलून त्या ठिकाणी नविन शिर्षक व नविन विनंती समाविष्ट करणे अशा प्रकारची दाव्याचे मूळ स्वरुप बदलणारी दुरुस्ती कायदेशीर तरतुदी अन्वये मागता अथवा मंजूर करता येत नसल्याचे स्पष्ट होते. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होउन त्यांचेवर सदरची दुरुस्ती अन्यायकारक ठरणार असल्याचे दिसून येते. सबब वर नमूद केलेली परिस्थीती पाहता वादींचा प्रस्तुतचा दावा दुरुस्तीचा अर्ज कायदेशीर तरतुदीस अनुसरुन नसल्याने नामंजूर करणे न्यायोचित असल्याचे निष्कर्षाप्रत येउन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज निशाणी क्र. १८ नामंजुर करण्यात येत आहे. |
| २. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

PRATAP VISHNU SAPKAL
Digitally signed by PRATAP VISHNU SAPKAL
Date: 2025.10.10 17:24:34 +0530

(पी.व्ही. सपकाळ)

दिनांक १०.१०.२०२५		दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

Name of the Stenographer : H. A. Uchade.

Name of court : C.J.J.D.& JMFC;Risod

Date : 10.10.2025

Judgment/Order signed by the Presiding Officer : 10.10.2025

Judgment/Order uploaded on : 10.10.2025